उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी
पत्र ९, महिना – नोव्हेंबर २०१७

# बिडे वार्तापत्र

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

**====================================**

## चाचणी

जुलैपासून उन्नती संस्थेने २ गावांत व ऑगस्टपासून आणखी एका गावात वर्ग सुरु केले. दुसरी व तिसरीला असलेली मुले या वर्गांत येऊ लागली. वाचायला आणि लिहायला शिकवणे हा या वर्गांचा प्रमुख उद्देश. मराठी वाचता व लिहिता येणे हा दुसरा उद्देश.

मातृभाषा कोरकू आणि शाळेचे माध्यम मराठी अशी परिस्थिती असताना मुलांना भाषा शिकवण्यासाठी आम्ही वेगवेगळ्या पद्धती वापरू लागलो. तीन ते चार महिने, म्हणजे सुमारे ६५ दिवस वर्ग चालल्यानंतर दिवाळीपूर्वी आम्ही चाचणी घेतली. ही चाचणी मुलांची नसून खरे तर आमची, आम्ही वापरत असलेल्या पद्धतीची होती. चाचणीचे निकाल आले आणि आम्हांला समाधान वाटले. सुधारणेला कुठे वाव आहे हे यातून आम्हांला जसे समजले तसे हेही लक्षात आले की आम्ही पकडलेली दिशा योग्य आहे, त्याने मुले शिकत आहेत.

**प्रश्न पहिला होता - शिकवलेल्या मुळाक्षरांचे व स्वरचिन्हांसहित अक्षरांचे वाचन** (प्रत्येक अक्षरास / स्वरचिन्हास एक गुण)

मुलांना २८ अक्षरे (मुळाक्षरे व काही स्वरचिन्हांसहित अक्षरे) वाचनास दिली होती. यात मुलांना चांगले गुण मिळाले आहेत. म्हणजे काहीही वाचता आले नाही, असे कुणीही नाही. चीचपानी येथील एक मुलगा आणि चंदनपुरमधील एक मुलगी यांना शिकण्यात अडचण आहे. गेल्या वर्षी यांना एकही मुळाक्षर येत नव्हते, पण या वर्षी कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या पद्धतीने काम करून म्हणजे त्यांना जवळ घेऊन, सरावपत्रिका वेळोवेळी सोडवायला देऊन मेहनत घेतली, तर साहिलला ४ तर निर्मलाला ५ अक्षरे वाचता आली.

| प्र. पहिला - | चीचपानी | चंदनपुर | चिपी |
|---|---|---|---|
| एकूण २८ गुण, २८ मुळाक्षरांचे वाचन | एकूण मुले | एकूण मुले | एकूण मुले |
| सर्वच मुळाक्षरांचे वाचन करता आलेली मुले | ११ | ९ | ३ |
| २१ ते २७ मुळाक्षरांचे वाचन करता आलेली मुले | ३ | १ | ३ |
| १५ ते २० मुळाक्षरांचे वाचन करता आलेली मुले | ३ | १ | ५ |
| १५ पेक्षा कमी मुळाक्षरे वाचता आलेली मुले | ४ | १ | २ |
| एकही मुळाक्षर वाचता न आलेली मुले | ० | ० | ० |
| | २१ | १२ | १३ |

**प्रश्न क्र. २ मध्ये परिचित शब्दांचे दृश्यवाचन** होते, (म्हणजे एखादे चित्र पाहून लक्षात राहतं तसे शब्दांचे कार्ड दाखवून दाखवून लक्षात ठेवणे आणि त्या शब्दांचे वाचन करणे).

| प्र. दुसरा - | चीचपानी | चंदनपुर | चिपी |
|---|---|---|---|
| एकूण ५ गुण, ५ शब्दांचे वाचन | एकूण मुले | एकूण मुले | एकूण मुले |
| सर्वच शब्दांचे वाचन करता आलेली मुले | १४ | १० | १२ |
| ३ ते ४ शब्दांचे वाचन करता आलेली मुले | ६ | २ | १ |
| १ ते २ शब्दांचे वाचन करता आलेली मुले | ० | ० | ० |
| एकाही शब्दाचे वाचता न आलेली मुले | १ | ० | ० |
| | २१ | १२ | १३ |

या प्रश्नात जास्तीत जास्त मुलांना शब्दांचे वाचन करता आले, कारण शब्द हे मातृभाषेतील होते दृष्यवाचनाने परिचित शब्दांचे वाचन करण्यास मुलांना

चांगले जमले. अर्थात, दृश्यवाचन जमले म्हणजे मुलांना वाचता आले असे अजिबात नाही. परंतु, वाचायला येण्यासाठी दृश्यवाचन ही आधीची पायरी आहे. चीचपानी या गावातील ६ मुलांना ३ ते ४ शब्दांचे वाचन करता आले. अनियमित असल्याने त्यांना सर्व शब्दांचे दृश्यवाचन करता आले नाही. एका मुलाला शिकण्याच्या प्रक्रियेमध्येच काही अडचण असल्याने त्याला एकाही शब्दाचे दृश्यवाचन करता आले नाही.

**प्रश्न क्र. ३ मध्ये - २८ मुळाक्षरे व स्वरचिन्हांसहित अक्षरांचे श्रुतलेखन** (सांगितलेले शब्द ऐकून लिहिणे) दिलेले होते. श्रुतलेखन करता येणे ही वाचन व लेखनाची अंतिम स्थिती असे गृहीत धरले होते. यात चंदनपुर गावातील १२ मुलांपैकी १० मुलांना श्रुतलेखन करता आले. चीचपानी आणि चिपी या ठिकाणी मुलांना अजून सराव देणे गरजेचे आहे असे लक्षात आले.

| **प्र. तिसरा -** | **चीचपानी** | **चंदनपुर** | **चिपी** |
|---|---|---|---|
| **एकूण २८ गुण, २८ मुळाक्षरांचे श्रुतलेखन** | **एकूण मुले** | **एकूण मुले** | **एकूण मुले** |
| सर्वच अक्षरांचे श्रुतलेखन करता आलेली मुले | ० | १० | २ |
| २१ ते २७ अक्षरांचे श्रुतलेखन करता आलेली मुले | ९ | १ | ४ |
| १५ ते २० अक्षरांचे श्रुतलेखन करता आलेली मुले | ६ | १ | ३ |
| १५ पेक्षा कमी अक्षरांचे श्रुतलेखन आलेली मुले | ६ | ० | ४ |
| एकही अक्षराचे श्रुतलेखन न आलेली मुले | ० | ० | ० |
| | **२१** | **१२** | **१३** |

**प्रश्न क्र. ४ मध्ये -** ५ शब्दांचे श्रुतलेखन आहे. यात चंदनपुर गावातील १२ मुलांपैकी ९ मुलांना सर्वच शब्द लिहिता आले. तर चिपी गावातील १३ मुलांपैकी ३ मुलांना सर्व शब्द लिहिता आले. चीचपानी गावातील २१ मुलांपैकी ७ मुलांना सर्व शब्द लिहिता आले. या ठिकाणीही सरावाची आवश्यकता आहे हे आमच्या लक्षात आले.

| **प्र. चौथा -** | **चीचपानी** | **चंदनपुर** | **चिपी** |
|---|---|---|---|
| **एकूण ५ गुण, ५ शब्दांचे श्रुतलेखन** | **एकूण मुले** | **एकूण मुले** | **एकूण मुले** |
| एकही शब्दांचे श्रुतलेखन न आलेली मुले | २ | ० | २ |
| सर्वच शब्दांचे श्रुतलेखन करता आलेली मुले | ७ | ९ | ३ |
| ४ ते ५ शब्दांचे श्रुतलेखन करता आलेली मुले | १० | २ | ४ |
| १ ते ३ शब्दांचे श्रुलेखन करता आलेली मुले - | २ | १ | ४ |
| | **२१** | **१२** | **१३** |

## कलोत्सव

वर्गांना १६ ते २५ ऑक्टोबर अशी दिवाळीची १० दिवस सुट्टी होती. सुट्या संपल्यावर वर्ग सुरु होतात, तेव्हा मुलांच्या उपस्थितीवर फार परिणाम होतो, म्हणजे मुलं अनियमित असतात, काही मुले बरेच दिवस वर्गांना येतच नाहीत इत्यादी. म्हणून सुट्टी संपल्यावर वर्ग सुरु केले तेव्हा आठ दिवस तीनही वर्गांमध्ये कलोत्सव केला. वर्गातच कलेचे कोपरे केले होते, जसे, बाहुलीघर, रांगोळी, कुतूहल कोपरा, कागदकाम, मातीकाम, रंगकाम, पझल्स इत्यादी. एके ठिकाणी गोष्टींची पुस्तकेही ठेवली होती. वेळापत्रकाचे कोणतेही बंधन मुलांना नव्हते. ज्याला जे करायचे ते त्याने / तिने करावे अशी मुभा मुलांना होती मुले खूप दंग होऊन जात. आमच्या वर्गात नसणारी गावातील इतर मुलेही या कलोत्सवासाठी येत. हे उपक्रम मुलांना खूप आवडले, तसेच पालकांनी सुद्धा या उत्सवाचा आनंद लुटला, चंदनपुर येथील पालक वर्गात येऊन मुलांसोबत पझल्स जोडण्यात तल्लीन झाले होते. या उत्सवामुळे मुलं वर्गाला नियमित यायला लागली.

**शिकू आनंदे वर्ग, चंदनपुर ता. तेल्हारा, जि. अकोला.**

